N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** गडचिरोली **P.S.(ठाणे):** कोरची **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0012 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/04/2021 16:14 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 24/02/2021
**Date To ( दिनांक पर्यंत):** 08/04/2021
**Time From (वेळेपासून):** 13:50 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:15 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 08/04/2021 **Time (वेळ):** 16:14 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 020 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/04/2021 16:14 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 3 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** ग्रापं कार्यालय नवरगाव, नवरगाव,कोरची

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** रामलाल नारायण माकडे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव):**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1969 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | टिळकनगर,ब्रम्हपूरी,ब्रम्हपूरी,ब्रम्हपूरी,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | टिळकनगर,ब्रम्हपूरी,ब्रम्हपूरी,ब्रम्हपूरी,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** ठेकेदार

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रकाश नानाजी पत्रे | | | 1. ग्रापं नवरगाव,नवरगाव,कोरची,कोरची, गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची रक्कम 500 रु च्या 16 नोटा | 8,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 8,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 08/04/2021नांव:- श्री रामलाल नारायण माकडे, वय 52 वर्षे, जात-कुणबी (ओबिसि), धंदा-कंत्राटदार/ठेकेदारी, रा. टिळक नगर, मुरलीधर मंदीराच्या मागे, मु.पो.ता. ब्रम्हपुरी, जि.चंद्रपुर. मो.नं.9404047404, 9404504913मी दिनंाक 24/02/2021 रोजी श्री रवि जी. राजुलवार, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय गडचिरोली यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार नोंदविली. श्री रवि जी. राजुलवार, पोलीस निरीक्षक यांनी माझे सांगण्याप्रमाणे माझी लेखी तक्रार नोंदवून त्यावर माझी सही घेतली. मी नोंदवलेली तक्रार खालीलप्रमाणे आहे.मी ठेकेदारी प्रमाणे गडचिरोली जिल्ह्यातील कोरची तालुक्यात विहीर बांधण्याचे काम करतो. त्या करिता ग्रामीण दुर्गम भागात शासकिय योजनांद्वारे काही प्रकल्प राबवायचे असल्यास ते प्रकल्प आणुन ठेकेदारीच कामें करतो. ग्रामपंचायत नवरगाव अंतर्गत मौजा भर्रिटोला येथे सन 2017-2018 या वित्तीय वर्षात तसेच ग्रामपंचायत नवरगाव अंतर्गत मौजा नवरगाव येथे सन 2018-2019 या वित्तीय वर्षात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत सार्वजनिक पिण्याच्या पाण्याची विहीर बांधकाम मंजुर असुन त्या ठिकाणी विहीर बांधकाम करावयाचे आहे. ग्रामपंचायत नवरगाव येथे ठराव घेवुन दोन्ही ठिकाणी विहीर बांधण्याचे काम ठेकेदारी प्रमाणे मला देण्यात आले. त्यानुसार ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली यांच्याकडुन शासकिय रक्कम भरून दोन्ही ठिकाणांचे सर्वेक्षण करून भूजल उपलब्धतेचे प्रमाणपत्र घेतले. त्यानंतर मला दोन्ही ठिकाणी काम करण्याबाबत कार्यारंभ आदेष देण्यात आला. त्यानुसार मी दि.01/03/2021 पासुन काम सुरू करणार होतो. दरम्यान मला ब्रम्हपुरी येथे राहणारे तसेच मौजा नवरगावंचे श्री प्रकाष नानाजी पत्रे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत नवरगाव, पंचायत समिती कोरची, जि. गडचिरोली हे काल दिनांक 23/02/2021 रोजी मला म्हणाले कि, तुम्हाला रू. 6,38,131/- च्या दोन विहीरींचे बांधकाम म्हणजे जवळपास 12-13 लाखांचे काम मिळाले. तुमचं काम मीच करून देणार आहे. केलेल्या कामाचा चेक मीच काढणार आहे. आमची काही व्यवस्था करा. यावर मी त्यांना म्हणालो, साहेब हे सरकारी काम आहे. यावर ते मला म्हणाले कि, मला 10 टक्के म्हणजे सव्वा लाख रू. लागतील. यावर मी त्यांना माझ्या आर्थिक अडचणी सांगीतल्यावर, श्री पत्रे, ग्रामसेवक मला म्हणाले कि, बघा, मला रोजगार सेवकाला पण पोसावं लागतें. त्याचे पैसे मी कोठुन काढणार? मी तुमच्या विहीर बांधकामाच्या बिलाचे चेक वेळेवर काढतो पण मला एकुण रू. 1,20,000/- तर दयावेच लागतील त्यापेक्षा एक रुपया कमी होणार नाही. भलेही पैसे एकदम नका देऊ. मला जसे लागतील तेवढे पैसे मला दया. सध्या रू. 10,000/- देवुन द्या. असे म्हणाले. तेव्हा मी नाईलाजाने भितीपोटी ठिक आहे साहेब पैसे जमवून आपणास कळवतो. असे सांगीतले. श्री प्रकाष नानाजी पत्रे, ग्रामसेवक, नेमणुक ग्रामपंचायत नवरगाव, पंचायत समिती कोरची, जि. गडचिरोली यांनी मी बांधकामाचे ठेकेदारी करीत असलेल्या विहीर बिलाचा चेक काढुन देण्याचा मोबदला म्हणुन एकुण रू. 1,20,000/- लाच रक्कमेची मागणी करुन त्यापैकी पहीला हप्ता म्हणुन रू. 10,000/- लाच रक्कमेची मागणी केली आहे. श्री प्रकाष पत्रे, ग्रामसेवक, नेमणुक

ग्रामपंचायत नवरगाव, पंचायत समिती कोरची, ता. कोरची, जि. गडचिरोली यांना रुपये 1,20,000/- पैकी पहीला हप्ता रु. 10,000/- लाच रक्कम देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी रु. 10,000/- घेऊन आपले कार्यालयामार्फत कारवाई होणेकरीता स्वेच्छेने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली येथे तक्रार देण्यास आलो. श्री प्रकाष नानाजी पत्रे, ग्रामसेवक, नेमणुक ग्रामपंचायत नवरगाव, पंचायत समिती कोरची, ता. कोरची, जि. गडचिरोली यांचेषी माझे कोणतेही वैयक्तीक वैर नसुन आर्थिक देवाण-घेवाण/उसणवारी अथवा भांडण नाही. म्हणुन मी त्यांचेविरुध्द कायदेषिर कारवाई करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. मी सोबत आणलेले रु. 10,000/- हे माझे वैयक्तिक बचतीतील आहेत. श्री रवि राजुलवार, पोलीस निरीक्षक यांनी 2 शासकिय पंचांना पाचारण करून त्यांची व माझी एकमेकांना ओळख करून दिली. श्री राजुलवार साहेब यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझा लेखी तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.श्री रवि राजुलवार, पोलीस निरीक्षक यांनी व्हाईस रेकार्डर कष्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकार्डरद्वारे रेकार्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. श्री रवि राजुलवार, पोलीस निरीक्षक यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 10,000/- (रू. 500/- दराच्या 20 चलनी नोटा) घेतले. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. सदरच्या नोटांना अॅथ्रसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखवुन लाचेच्या रक्कमेस अॅथ्रसिन पावडर लावली. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी श्री राजुलवार यांनी पंचनामा क्रं. 1 मध्ये घेतल्या आहेत.दिनांक 24/02/2021 रोजी पोलीस निरीक्षक राजुलवार, मी, षासकीय पंच व स्टाफ सह लाचलुचप प्रतिबंधक विभाग कार्यालय गडचिरोली येथुन षासकिय वाहनाने रवाना होवुन मौजा नवरगाव गावाचे अलीकडे पोहचुन रस्त्याचे कडेला आडोसा घेवून थांबून होतो. श्री राजुलवार, पोलीस निरीक्षक यांनी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याप्रमाणे व्हाईस रेकार्डर सुरू करून व्हाईस रेकार्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हाईस रेकार्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह श्री पत्रे, ग्रामसेवक यांचेकडे ग्रामपंचायत कार्यालय नवरगाव येथे जाण्यास रवाना केले. श्री पत्रे, ग्रामसेवक यांनी पंच क्रं. 1 यांचे समक्ष मी बांधकामाची ठेकेदारी करीत असलेल्या विहीर बिलाचा चेक काढुन देण्याचा मोबदला म्हणुन एकुण रू. 1,20,000/- लाच रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रु. 1,00,000/- लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्षविली. परंतु रु. 1,00,000/- लाच रक्कमे पैकी पहीला हप्ताचे पैसे मला ज्यावेळीस लागतील त्यावेळेस कळवितो असे म्हणाले. मी पंच क्रं. 1 सह पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांचेकडे परत गेलो असता, पंच क्रं. 1 यांच्या आवाजानंतर व्हाईस रेकार्डर बंद करण्यात आला. आम्हास सुचना देण्यात आल्या की, गै.अ. श्री पत्रे हे जेव्हा आपणास पहील्या हप्त्याचे लाच रक्कमेबाबत सांगतील तेव्हा आम्हास संपर्क करावा. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी श्री राजुलवार यांनी पंचनामा क्रं. 2 मध्ये घेतल्या आहेत.आज दि. 08/04/2021 रोजी लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील तपासी अधिकारी श्री सुरेंद्र गरड, षासकिय पंच व स्टाफसह शासकिय वाहनाने मौजा नवरगाव गावाचे अलीकडे पोहचुन माझे मोबाईल फोनवर संपर्क करुन मला तिथे बोलावून घेतले. मी त्यांचे समक्षे पोहचलो. गै.अ. श्री पत्रे यांचे मोबाईल फोनवर ते आहेत की काय ? याकरीता संपर्क केला असता, त्यावेळी मला गै.अ. यांनी रु. 1,00,000/- लाच रक्कमे पैकी पहीला हप्ता रु. 10,000/- लाच रक्कमेची मागणी करुन माझे विनंती वरुन तडजोडीअंती रु. 8,000/- लाच रक्कम स्विकारण्याची संमती दर्षविली. पंचासमक्ष अॅथ्रसिन पावडर लावलेल्या नोटांचा षिलबंद लिफापा फोडून त्यातील 2,000/- रु. मला वेळीच परत केले व रु.8,000/-(500/रु. दराच्या 10 नोटा) लाचेची रक्कम देण्यात आली. ती माझे षर्टचे छातीभागावरील डावे बाजुचे खिष्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन लोकसेवक यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर आपल्याजवळील दुपट्टा डोक्याला बांधावे असा इषारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इषारा मिळताच लाच रक्कम स्विकारणायास रंगे हाथ पकडतील असे सांगण्यात आले. पोलीस उप अधिक्षक श्री सुरेंद्र गरड यांनी व्हाईस रेकार्डर सुरु करून व्हाईस रेकार्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हाईस रेकार्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह ग्रामपंचायत नवरगाव येथे श्री पत्रे, ग्रामसेवक यांचेकडे जाण्यास रवाना केले. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटा-गटाने माझे मागोमाग आले. मी व पंच क्रं. 1 ग्रामपंचायत कार्यालयात गेलो असता, त्याठिकाणी श्री पत्रे, ग्रामसेवक हजर होते. त्यावेळी मी अॅथ्रसिन पावडर लावलेल्या रू. 8,000/- लाचेची रक्कम माझे फुलपंटच्या डावे बाजुचे खिष्यातुन काढुन श्री पत्रे, ग्रामसेवक यांना दिल्या असता, त्यांनी लाच रक्कम रू. 8,000/- आपल्या उजव्या हाताने घेवुन त्यांचे अंगातील फुलपन्टचे डावे बाजुचे खिष्यात ठेवली. त्यावेळी मी पंच क्रं. 1 सोबत दर्षनी ठिकाणी येवुन सापळा पथकास माझे जवळील दुपट्टा डोक्याला बांधून लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इषारा केला. त्यावेळी सापळा पथकाने श्री पत्रे, ग्रामसेवक यांना रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली. सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उप अधीक्षक सुरेंद्र गरड यांनी पंचनामा क्रं. 3 मध्ये घेतल्या आहेत.तरी लोकसेवक श्री प्रकाष नानाजी पत्रे, वय 43 वर्षे, धंदा-नौकरी, ग्रामसेवक, ग्रामपंचायत नवरगाव, पंचायत समिती कोरची, ता. कोरची, जि. गडचिरोली यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून मी बांधकामाची ठेकेदारी करीत असलेल्या विहीर बिलाचा चेक काढुन देण्याचा मोबदला म्हणुन 1,00,000/- रु. लाचेची मागणी करुन त्यापैकी पहीला हप्ता 10,000/-रुपये लाचेची मागणी केली. लाच स्विकृत्ती करत्यावेळी माझे विनंती वरुन तडजोडीअंती रु. 8,000/- लाच रक्कम माझेकडुन पंचासमक्ष स्विकारली. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यानुसार कायदेषीर फिर्याद आहे. माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): vinod dadaji godbole(SI (Sub-Inspector)) / pobn81294 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची

**Name** (नाव): vinod dadaji godbole
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): pobn81294

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)